# प्रेस नोट

दिनांक १६/०८/२०२६

## पोलीस उप आयुक्त, पुर्व परिमंडळ-३, मुंबई.
## मुलुंड पोलीस ठाणे, मुंबई.

### ‘‘ तरुणीवर लैंगिक अत्याचाराचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस अटक ’’

दिनांक ०६/०८/२०२६ रोजी पहाटेच्या सुमारास एक तरुणी शिक्षणासाठी जात असताना मुलुंड पोलीस ठाणे हद्दीतील एका रस्त्यावर एका अज्ञात इसमाने तिचा पाठलाग करून तिला रस्त्यालगतच्या झाडीमध्ये नेले व तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. झटापटीदरम्यान तरुणीला दुखापत झाली. याबाबत पीडितेच्या तक्रारीवरून मुलुंड पोलीस ठाणे गु.र.क्र. ९५४/२०२६, कलम ७४, ७६, ७९, ११५(२), ३५१(२) भारतीय न्याय संहिता, २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध ०६ तपास पथके तयार करण्यात आली. घटनास्थळ व आजूबाजूच्या परिसरातील २५० CCTV फुटेजचे १२० तासांचे बारकाईने विश्लेषण, तांत्रिक तपास, अभिलेखांची पडताळणी तसेच गोपनीय माहितीच्या आधारे आरोपीचा शोध घेण्यात आला.

घटनास्थळी येण्या-जाण्याच्या मार्गावरील जवळपास २५० सीसीटीव्ही फुटेज तपासणी केली असता, एक संशयीत इसम पहाटेच्या वेळी गुन्ह्याचे अगोदर व गुन्ह्याच्या नंतरच्या दिवशी घटनास्थळाच्या परिसरात मोटर सायकलवरुन फिरत असल्याचे अस्पष्ट दिसून आले तसेच दिनांक १४/०८/२०२६ रोजी तपास पथकास घटनास्थळ परिसरात संशयास्पद हालचाल करणारा तसाच इसम आढळून आला. तो मोटारसायकलवरून निघून गेल्यानंतर त्याच्या हालचालींच्या मार्गावरील CCTV फुटेजच्या आधारे त्याचा माग काढण्यात आला. प्राप्त गोपनीय माहितीनुसार त्यास ताब्यात घेऊन तपास केला असता, उपलब्ध पुराव्यांच्या आधारे त्याचा सदर गुन्ह्याशी संबंध निष्पन्न झाल्याने त्यास अटक करण्यात आली.

अटक आरोपी :- अनिल रामचरण करोटिया, वय ३१ वर्षे, रा. वाल्मिक नवयुवक सुधारक समिती, सी.पी. तलाव परिसर, वागळे इस्टेट, ठाणे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक मायादेवी काळगावे करीत आहेत.

तपासादरम्यान आरोपी घटनास्थळ परिसरात यापूर्वीही वारंवार येत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे सदर व्यक्तीकडून अशाच प्रकारचा त्रास, छेडछाड अथवा लैंगिक स्वरूपाचा गैरप्रकार झालेला असल्यास संबंधित महिला/तरुणींनी निर्भयपणे मुलुंड पोलीस किंवा जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा. अशा तक्रारींची दखल घेऊन आवश्यक कायदेशीर कारवाई करण्यात येईल व तक्रारदाराची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येईल.

पीडितेची ओळख व गोपनीयता कायद्यानुसार पूर्णपणे सुरक्षित ठेवण्यात येत आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त बृहन्मुंबई, देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (का.व सु.) डॉ. मनोज कुमार शर्मा, मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, धनंजय कुलकर्णी, मा. पोलीस उप आयुक्त, पूर्व परिमंडळ-३, अभयसिंह देशमुख, मा. सहायक पोलीस आयुक्त, मुलुंड विभाग, सुदर्शन होनवडजकर यांचे मार्गदर्शनाखाली मुलुंड पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, संतोष घाटेकर यांचे नेतृत्वात पोलीस निरीक्षक, नितीन खाडगे, मायादेवी काळगावे, सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रय बनसोडे, मनोज पाटील, पोलीस उप निरीक्षक स्वप्निल महाजन, विक्रम ताकमोगे, विकास चव्हाण, सागर नाळे तसेच पोलीस उप आयुक्त, पुर्व परिमंडळ-३ अंतर्गत येणाऱ्या पोलीस ठाणेतील गुन्हे प्रकटीकरण पथक व गुंडा पथकातील अंमलदार किरण चव्हाण, हेमंत शेडगे, राजेश चौगुले, रणजित माळी, संदीप परदेशी, अशोक भोर, अशोक खराडे, निलेश भोईर, शरद माळी, प्रशांत बामणे, साहेबराव सोनकांबळे, गणेश पाटील, राजेंद्र ठाकुर, विष्णू आव्हाड, देवीदास डोंगरे, विवेक शिंपी, सागर गावडे, भिमराव तरडे, महेश सरकटे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

ooooo